Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# लोकमान्य टिळकांचे कृषीविषयक विचार

**आशिष रामदास देरकर**
''उच्च शिक्षण, संशोधन आणि विशेष अभ्यास संस्था'' डॉ. खत्री महाविद्यालय, तुकुम,चंद्रपूर
*Corresponding Author :- ashishderkar@gmail.com

Communicated : 13.01.2023 | Revision : 19.02.2023 Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
ब्रिटीश राजवटीत देशातील शेतकऱ्यांचे मोठ्यप्रमाणात शोषण होत होते. लोकमान्य टिळकांनी सन१८९५—९६ मध्ये त्यांच्या केसरी या वृत्तपत्रामध्ये शेती व शेतकऱ्यांविषयी अनेक लेख प्रकाशित केले आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सुमारे १२७ वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार आज एकविसाव्या शतकातही तंतोतंत लागू पडणारे आहे. त्यांनी त्या काळातील शेतकऱ्यांच्या नेमक्या समस्या ओळखल्या होत्या. सर्वसामान्य शेतकऱ्यांना व नागरिकांना समजेल अशा शब्दात त्या समस्या व उपायांची मांडणी लोकमान्य टिळकांनी आपल्या लेखणीतून केली होती.

टिळकांचे शेतीविषयक विचार बघितल्यास दुष्काळाच्या काळातले 'केसरी'चे सगळेच अंक शेतकऱ्यांच्या समस्या व उपायांनी भरलेले आहेत. ब्रिटीश सरकारचे धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नव्हते. या काळात शेतकरी वर्ग त्यांच्या समस्यांची पत्रे लोकमान्य टिळकांना पाठवून त्या सोडवण्यासाठी काय करावे? या प्रश्नाचे उत्तर टिळकांकडून अग्रलेखातून मिळवित होते. आपल्या हक्काचे ओरडून, भांडून, सरकारकडून मागून घ्या, असे सांगून टिळक केसरीतून शेतकऱ्यांची जनजागृती करीत होते. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या दुष्काळाचा प्रश्न निवारण्यासाठी टिळकांनी केलेली जनजागृती शेतकऱ्यांसाठी आजही गरजेची असून दुर्लक्ष करण्यासारखी नाही. म्हणून लोकमान्य टिळकांचे कृषीविषयक विचार अभ्यासणे महत्वाचे ठरणार आहे.

**मुख्यशब्द :** कृषिविषयक समस्या, कृषिविषयक समस्यांवर उपाय, दुष्काळ निवारण, शेतकऱ्यांवरील अन्यायाविरुद्ध ब्रिटीश राजवटीला आव्हान, केसरी वृत्तपत्र

## प्रस्तावना :

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशातील शेती व शेतकरी समृध्द झाल्यास देश समृध्द होईल. हे टिळकांनी तेव्हाच ओळखले होते. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांची केसरी वृत्तपत्राच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य लोकमान्य टिळकांनी केले. त्यांनी अनेक लेखांच्या माध्यमातून सरकारच्या शेतीविषयक धोरणांवर कडाडून टिका केली.

टिळकांनी, व्यवसाय शिक्षणाला कृषी शिक्षणाची जोड दिली. जेवढी उपलब्ध आहे त्या जमिनीत चांगले व अधिक धान्य कसे पिकवता येईल, संकरित बी—बियाणे, शेतीमालांवर प्रक्रिया उद्योग, अत्याधुनिक शेती अवजारे, शेतीविषयक जोडधंदे या विषयांवर लोकमान्यांनी आपल्या लेखनातून बरीच जनजागृती केली. ''भारतातील बहुतांश लोकांचा उदरनिर्वाह जमिनीवर चालतोय. पण जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे याचा विचार केला म्हणजे अंगावर काटा उभा राहतो. घरात अठरा विश्वे दारिद्र्य! कर्जाचा बोजा डोईवर इतका, की घरदार, गुरेढोरे गहाण पडली तरी सालअखेर कशी मजल पोहचेल याची पंचाईत. शेतकरी सावकाराकडून कर्ज काढतो ते गरजेकरता काढतो व ही त्याची गरज जोपर्यंत कायम राहील, तोपर्यंत त्यास हा नाही तो सावकार बघावा लागणारच. तेव्हा शेतकऱ्याची गरज ज्या योगे कमी होईल असे उपाय पहिल्याने योजिले पाहिजेत आणि इतके करूनही गरज राहिली, तर हलक्या व्याजाने पैसे मिळण्याची तजवीज झाली पाहिजे. तात्पर्य, देशातील उद्योगधंदे वाढवणे आणि शेतकऱ्यांस हलक्या व्याजाने पैसे देण्याकरिता पेढ्या काढणे, हे दोनच त्यास ऋणमुक्त करण्याचे खरे उपाय आहेत.''

हे उद्गार कोणत्या आधुनिक शेती तज्ज्ञाचे, शेतकरी नेत्याचे नाहीत. तर हे उद्गार आहेत लोकमान्य टिळकांचे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे त्यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी केलेले

निदान व त्यावर सुचवलेले उपाय हे दोन्ही मुद्दे आजही तंतोतंत लागू पडणारे आहेत. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न नेमके ओळखले होते व ते त्यांची मांडणी सर्वसामान्य माणसाला समजेल अशा पद्धतीने करत होते.

संशोधक विद्यार्थी मानवविद्या शाखेतील अर्थशास्त्रात 'लोकमान्य टिळकांचे आर्थिक विचार' या विषयावर गोंडवाना विद्यापीठात आचार्य पदवीचे शिक्षण घेत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात लोकमान्य टिळकांनी अर्थशास्त्रातील शेती व शेतकरी या विषयावर सखोल लिखान केले. या शोधनिबंधात संशोधकाने लोकमान्य टिळकांनी मांडलेल्या शेती व शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कारणे, शेतकऱ्यांसमोरील समस्या, त्यावर सुचविलेले उपाय व सरकारची भुमिका याचे विश्लेषण या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**लोकमान्य टिळकांचे कृषीविषयक विचार**

**१. दुष्काळाचा शेतकऱ्यांच्या जीवनमानावर होणारा परिणाम**

लोकमान्य टिळकांनी शेतीविषयक दुष्काळावर तळमळीने भाष्य केले. अतिवृष्टी होऊन जो पाऊस पडला, त्याबाबत सरकारकडून कोणतीही मदत न मिळाल्याने शासनाच्या उदासीनतेचा प्रचंड फटका शेतकऱ्यांना बसेल अशी भीती टिळकांना वाटू लागली होती. मदतीविना शेतकरी उपाशी मेला तरी चालेल मात्र सरकारला जाग येणार नाही. असे लिहून शेतकऱ्यांना दुष्काळी मदत न करणारे सरकार शेतकऱ्यांच्या दैनावस्थेला कसे जबाबदार आहे हे त्यांनी दाखवून दिले. आणि शेतकऱ्यांमध्ये आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी असंतोष निर्माण करण्याचे कार्य त्यांची केले.

**२. शेतकऱ्यांना सरकारी योजनांच्या मागणी अर्जाबाबत मार्गदर्शन**

त्याकाळी शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचे टिळकांकडे 'केसरी' हे प्रभावी साधन होते. 'गावचा अधिकारी ऐकत नाही, कलेक्टरकडे मदत मागायला गेलो की अधिकारी हुज्जत घालतो. त्यामुळे काय करावे समजत नाही. अशावेळी तुम्ही मार्ग सुचवा,' अशी पत्रे टिळकांना शेतकरी पाठवत होते. त्याला टिळक आपल्या लेखणीतून हमखास उत्तरे देत होते. आपल्याला नवल वाटेल, पण शेतकऱ्यांनी अधिकारी लोकांना आपले हक्क मागण्यासाठी अर्ज कसे करावेत आणि अर्ज करताना शेतकऱ्यांनी काय काय मागावे, याची यादी टिळकांनी एका लेखात दिलेली आहे. शेतकऱ्यांना अगदी व्यावहारिक ज्ञान टिळकांनी दिले होते. जे आजच्या पुढाऱ्यांनाही लाजवेल असे आहे.

**३. कायदेशीर मार्गाने हक्क मिळविण्याचे आवाहन**

सरकारकडून आपले हक्क मिळवायचे असेल तर कायदेशीर मार्ग निवडण्याचे आवाहन टिळकांनी शेतकऱ्यांना केले होते. टिळक कायद्याच्या मर्यादा पाळून हे करत असल्याने सरकारला त्यांच्याविरुद्ध कारवाईदेखील करता येत नव्हती. या प्रचाराद्वारे आपल्यालाही हक्क असून कायदेशीर मार्गाने ते आपण मिळवायला हवेत याची पहिली जाणीव टिळकांनी शेतकऱ्यांना करून दिली.

**४. आयात—निर्यात धोरणांवर भाष्य**

टिळकांच्या मते, आयात—निर्यातीतून भारताकडून इंग्लंडला दरवर्षी होणारा फायदा तब्बल †ॅ ते ५ॅ कोटींच्या घरात आहे. भारतात काम करणारे ब्रिटीशांचे सर्व कर्मचारी, त्यांचे पगार आमच्या पैशातून इंग्लंडमध्ये पाठवतात. हिंदुस्थान सरकारला लागणारी लढाऊ विमाने, गलबते, तोफा वगैरे मोठ—मोठ्या सामानांपासून ते टाचणीपर्यंत प्रत्येक पदार्थ इंग्लंडकडून खरेदी केला जातो. भाज्या, फळे, दूध हे तिकडून आणता येत नाहीत, नाही तर तेही आणायला कमी केले नसते. याचे परिणाम शेतीसह सगळ्याच अर्थव्यवस्थेवर होतात असे टिळक लिहितात.

**५. भांडवलाचे महत्त्व**

कोणत्याही उद्योगाची प्रगती करायची असल्यास भांडवलाशिवाय पर्याय नाही. हे टिळकांनी ओळखले होते.

भांडवलाशिवाय शेतीची भरभराट होऊ शकत नाही. शेती फायद्यात ठेवायची असेल किंवा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल, तर भांडवल अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी या जमिनीच्या आकारमानामुळे नाहीत, तर भांडवलाच्या अभावामुळे आहेत. लहान शेती ही सुद्धा किफायतशीर होऊ शकते. त्यासाठी भांडवलाला मुक्त वाव दिला पाहिजे. तसे झाल्यास शेतीची मोठ्या प्रमाणावर भरभराट होईल, अशीही मांडणी टिळकांनी केली आहे.

**६. शेतीची निकृष्टावस्था म्हणजे राष्ट्राची निकृष्टावस्था होय**

भारत कृषीप्रधान देश असल्याने शेती उद्योगच देशाच्या अर्थव्यवस्थेला तारू शकतो. हे टिळकांना समजले होते. शेतीची निकृष्टावस्था म्हणजे सगळ्या राष्ट्राचीच निकृष्टावस्था होय असे टिळक म्हणतात. आजही शेती व्यवसायाला तितकेच महत्त्व आहे जे लोकमान्यांनी तेव्हा ओळखले होते.

**टिळकांच्या काळात शेतकऱ्यांच्या समस्या**

**१. विणकर मजुरांची दुरावस्था**

दुष्काळामुळे शेतातल्या मजुरांची कामे बंद पडली होती. शेतात काम नसल्याने मजूर वर्ग इतर कामाचा शोध घेत असे, विणकर लोकांचा प्रश्न असाच ऐरणीवर आलेला. विणकर लोकांकडे काम उपलब्ध नसल्याने त्यांना खडी फोडायला पाठवावे, अशी सरकारची इच्छा होती, पण त्याऐवजी सरकारने कापूस आणि इतर सामान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी टिळक करत होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादनही सुरू राहील आणि विणकर लोकांच्या हाताला काम पण मिळेल ही टिळकांची भावना होती.

**२. शेतकऱ्यांची कैद्यांसारखी स्थिती**

तुरूंगातील कैद्यांपेक्षा दुष्काळी शेतकऱ्यांची अवस्था फार बिकट होती. दुष्काळात अडकलेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून सन्मानजनक मदत ब्रिटीश राजवटीत मिळत नव्हती. ही खंत टिळकांना सतत बोचत होती. तुरुंगातल्या सर्वात खालच्या वर्गातील कैद्याला जितकी शिधा मिळते, त्याच्या बरोबरीची किंवा कधी–कधी तर त्याहूनही कमी शिधा शेतकरी व दुष्काळी कामासाठी गेलेल्या मजुराला मिळते याची जाणीव त्यांनी सरकारला करून दिली होती.

**३. भारताला कमजोर करणारे उद्योग**

भारताला कमजोर करणारे उद्योग बंद करून भारतीय रोकड देशातच राहतील अशा उद्योगांची स्थापना व्हावी, जी भारतातील शेती व्यवसायाला बळ देईल अशी टिळकांची अपेक्षा होती. अर्थव्यवस्थेत सुधारणा करायची, आणि शेतीसह शेतकऱ्याला वाचवायचे असेल, तर लष्कराचा खर्च कमी करा, इंग्लंडला जाणाऱ्या पैशाचा ओघ कमी करा, असा सज्जड सल्ला टिळक देतात.

**४. उत्पन्नापेक्षा लोकसंख्या वाढीचा जास्त दर**

उत्पन्नापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्तअसल्याने शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे दारिद्र्यात भर पडली असून शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले पाहीजे हा विचार टिळकांनी मांडला. त्यामुळे शेतकऱ्यांना समृध्द करण्यासाठी सरकारने केवळ सारा कमी न करता शेतीवर अधिकाधिक दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात अशी सूचना टिळक करतात.

**५. रेल्वेवर खर्च मात्र कालव्यांवर नाही**

पाटबंधारे व रेल्वे यांत ब्रिटिश सरकारने नेहमीच दुजाभाव दाखवला होता. रेल्वेवर जेव्हा ३६९ कोटी रुपये खर्च केले, तेव्हा पाटबंधारे करण्यासाठी फक्त ४३ कोटी रुपये खर्च झाले होते. हे सर्व मुद्दे लोकमान्य अत्यंत बारकाईने मांडत होते. सरकारला जर कायम दुष्काळ निवारण करायचे असेल तर पाटबंधारे, विहीरी यावर खर्च करावा असे टिळक सुचवितात.व्यापार करण्यासाठी सरकार रेल्वेवरती जितका खर्च करते त्याच्या एक तृतीयांश

खर्चदेखील कालव्यांवर करत नाही. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येनुसार ओलिताखाली जितकी जमीन यायला हवी तितकी आणता येत नाही. ब्रिटीशांना मुळात भारतीय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवायचे नव्हते हे विशेष!

**शेती समृध्दीसाठी लोकमान्यांनी सुचविलेले उपाय**

**१. शेतकऱ्यांमध्ये हक्काची जाणिव निर्माण करणे**

लोकमान्य टिळकांनी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांमध्ये आपल्या हक्काची जाणिव निर्माण करण्याचे कार्य केले. टिळकांचे एकच म्हणजे होते, ‘‘हीच वेळ आहे, आताच सरकारची परीक्षा घ्या. सरकार मोठा आव आणून आम्ही तुमच्यासाठी खूप काही करतोय, असा दिखावा करत असताना प्रत्यक्षात काय घडते?‘‘ याची जाणीव टिळक लोकांना करून देत होते. ‘देणारा आहे, पण मागणारेच नाहीत,’ अशी परिस्थिती येऊ नये, यासाठीचा हा टिळकांचा खटाटोप होता. ‘‘ओरडून ओरडून भांडून मागून घ्या,’’ असे सांगून टिळक शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करीत होते.

**२. फॅमिन कोड बिल**

दुष्काळाच्या काळात ‘फॅमिन कोड‘ बिलाच्या माध्यमातून सरकारने शेतकऱ्यांसाठी काही योजना सुरू केल्या होत्या. त्या इंग्रजीत असल्याने अशिक्षित अडाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अशक्य होते. सरकारने दिलेली वचने पुष्कळदा कागदावरच राहत असत. तळागाळात त्याची अंमलबजावणी अजिबात होत नव्हती. अशावेळी ‘फॅमिन कोड‘ काय सांगते आणि त्याच्यानुसार सरकारने शेतकऱ्यांना काय अधिकार दिले आहेत, हे सोप्या भाषेत समजावून सांगणे टिळकांनी फार मनापासून केले.

**३. आर्थिक विषमता नष्ट करणे**

श्रीमंतांना जास्तीचा कर लावावा आणि गरिबांना कमी कर लावावा. शेतकऱ्यांना कमी कर लावला, तर त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, हे टिळकांचे अर्थविषयक म्हणणे आजही विचारात घेण्यासारखे आहे. त्याकाळात गरीब व श्रीमंतांमधील असणारी आर्थिक दरी टिळकांनी ओळखली होती. ही आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकारला उपाययोजना सुचविली होती जी आजही तितकीच उपयुक्त आहे.

**४. लघु उद्योग उभारणी**

शेतीच्या उद्धारासाठी जुन्या ग्रामसंस्था टिळकांना महत्त्वाच्या वाटत होत्या. इंग्रजी राज्यापेक्षा तिथे अधिक आर्थिक संपन्नता मिळत असे. म्हणून ग्रामीण भागात उद्योग उभारले पाहिजेत, असा विचार टिळक करतात. भारतासारख्या देशात शेतीची अर्थव्यवस्था सुधारायची असेल, तर लहान उद्योगांना उभारी द्यावी लागेल, याबद्दल टिळक फार आग्रही होते. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग गावोगावी सुरु झाले, तर शेतमाल योग्य प्रमाणात वाटला जाईल व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल परंतु, आपल्याकडे त्याबद्दल काहीच प्रगती नसल्याची टिळकांना खंत होती.

**५. लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन**

लांब धाग्याच्या कापसामुळे कापड उद्योग किंवा सुत गिरण्यांना चालना मिळेल, त्यासाठी लांब धाग्याच्या कापसाची विदेशातून आयात करावी लागणार नाही. मात्रतेव्हा आपल्याकडे लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन होत नसे, ते व्हावे म्हणून लांब धाग्याच्या कापसाचे बियाणे विकसित करावे, असा सल्ला लोकमान्य टिळक सरकारला देतात. लांब धाग्याचा कापूस जर भारतात पिकू लागला, तर आपल्या अर्थव्यवस्थेला त्याचा मोठा फायदा होईल असे टिळकांना वाटत होते. कालांतराने लांब धाग्याची बियाणे विकसीत होऊन लांब धाग्याच्या कापसाचे पीक देशात उगवू लागले.

**६. साखर उद्योगांची उभारणी**

मॉरिशियस हा महाराष्ट्रातल्या एखाद्या लहानशा तालुक्याइतका लहानसा देश. या बेटातून तीन कोटींचा

e-ISSN 2347 – 517X
Original Article

माल परदेशात निर्यात केला जातो आणि त्यातील २ कोटी ८० लाखांची साखर हा देश इतर देशांना निर्यात करतो. ६०—७० हजार एकरावर ऊस लावला जातो आणि जवळपास ८० साखर कारखाने या देशात आहेत. बहुतेक साखर भारत विकत घेतो, असेही टिळक म्हणतात. महाराष्ट्राने लक्ष द्यावे कारण, महाराष्ट्रात उसाचे उत्पादन भरपूर करण्याला वाव आहे. असे टिळकांनी त्याकाळात म्हटले होते.

'एकट्य महाराष्ट्रातच उसाची लागवड वाढविण्यासाठी एवढी जागा आहे की मॉरिशियस बेटातून येणारी सगळी साखर आम्ही उत्पन्न करू. एवढेच नव्हे, तर आम्हास लागणारा गुळही आम्ही उत्पन्न करून परदेशास नाही, तर भारताच्या सगळ्य भागात चांगल्या साखरेचा पुरवठा करू शकतो. एवढा आत्मविश्वास टिळक व्यक्त करतात. महाराष्ट्र साखर उत्पादनात आजही अग्रेसर आहे.

### ७. शेतकरी साक्षरता व प्रशिक्षण

देशामध्ये शेतकऱ्यांसाठी सर्वत्र अनुकूल नैसर्गीक वातावरण असताना शेती व शेतकऱ्यांची वाताहत झाली आहे. त्यामुळे टिळक तळमळीने सरकारला सुचवतात, "लवकरात लवकर सरकारने शेती खात्याच्या मार्फत शेतकऱ्यांना याबद्दल सज्ञान करावे, नाहीतर दुसरेच लोक इथे येतील आणि आमचे शेतकरी मात्र या फायद्यापासून वंचित राहतील असे म्हणून त्याकाळात सरकारकडे शेतकरी साक्षरता व प्रशिक्षणाची मागणी करतात हे विशेष!

### ८. सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता

टिळकांच्या काळात देखील शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर असत. शेतकऱ्यांची एकूण कर्जबाजारी अवस्था हा मुद्दा टिळकांनी नेटाने लावून धरला होता. या कर्जबाजारीपणातून शेतकऱ्याला बाहेर काढायचे असेल, तर प्रथम त्याला सावकारीच्या पाशातून बाहेर काढावे लागेल, हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागेल हे सांगून, शेतकऱ्याला कमी व्याजाने पतपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली पाहिजे, हा आग्रह त्यांनी धरला होता. यावरून टिळकांची जगाच्या शेतकऱ्यांविषयी असलेली तळमळ दिसून येते.

### निष्कर्ष :

टिळक बालपणी कोकणात वाढले, नंतर पुण्यात आले, संपूर्ण आयुष्यात त्यांचा शेती व्यवसायाशी कधीही संबंध आला नाही. त्यांनी कधीही शेती केली नाही. तरीही अत्यंत अचूक, विश्लेषण करणारी मते त्यांनी शेतीबद्दल मांडली. टिळक कधीही अधिकृतरित्या अर्थशास्त्र शिकलेले नव्हते, ते अर्थशास्त्राचे अभ्यासक कधीही नव्हते. तरीही इतके आवश्यक चिंतन टिळकांनी केले. टिळकांच्या या सगळ्य मांडणीवरून, टिळकांना आपण भारताचे पहिले कृषी अर्थतज्ज्ञ म्हणण्यास हरकत नाही.

### संदर्भ :

समग्र टिळक खंड ३
लोकमान्य टिळक यांचे चरित्र — भाग घ, न. चिं. केळकर
डॉ. रोहित दी. टिळक : लोकमान्य टिळक यांचे राष्ट्रीय अर्थशास्त्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन, पुणे (२०१४)
दुष्काळाची कारणे, 'केसरी' अग्रलेख, ८ मे १९००
Sorab Ghaswalla : 'Lokmanya Tilak : Symbol of Swaraj', Rupa Publication (2003)
M.G. Ranade : Essays In Indian Economics, G.A. Natesan & Co. Madras 1920
https://maharashtratimes.com 26 July 2020
टिळक — दि इकॉनॉमिस्ट— त्यं. वि. पर्वते